**महाराष्ट्र शासन**
**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, बारामती, जि. पुणे,**
**अधिष्ठाता यांचे कार्यालय**
Contact No:- 9822961494 / 9890859235, E-mail ID:- gacbaramati@gmail.com

जा.क्र.शाआमवरुबापु/आस्था/अध्यापक/कंत्राटी/तात्पु.कालावधी/ ४५२/२०२३, दि. १३/०३/२०२३

**कंत्राटी पध्दतीने अध्यापकांची पदे भरणेबाबत.**

संदर्भ :- १) शा.नि.वै.शि.व औ.द्र.वि.क्र.एमईएस-१५०८/प्र.क्र.९४/०८/विसेवा-१, दि.०७-०९-२०२१.
२) शा.नि.वै.शि.व औ.द्र.वि.क्र.आयुसे-१०२१/प्र.क्र.१३०(भाग-१)/आयु-१, दि.०८-११-२०२२.

शासन निर्णय वै.शि.व औ.द्र.वि.क्र.एएमसी-२०२१/प्र.क्र.१४७/२१/शिक्षण-१, दि.२०-०३-२०२१ अन्वये बारामती (पुणे) येथे १०० विद्यार्थी क्षमतेचे नवीन शासकीय आयुर्वेद महाविद्यालय स्थापन करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. तसेच शा.नि.वै. शि.व औ.द्र.वि.क्र.एएमसी-२०२१/प्र.क्र.१४७/२१/शिक्षण-१, दि. १४-१२-२०२२ अन्वये या महाविद्यालयात शासनाने शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ पासून पदवी १०० विद्यार्थी प्रवेशास मान्यता दिलेली असून त्यानुसार या महाविद्यालयात पदवी १०० विद्यार्थी प्रवेशीत झालेले आहेत. शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व संलग्नीत रुग्णालय, बारामती, जि. पुणे येथील प्राध्यापक (शारीर रचना-संभावित रिक्त पद) व सहयोगी प्राध्यापक, संस्कृत संहिता सिध्दांत तसेच सहाय्यक प्राध्यापक (संस्कृत) संस्कृत संहिता सिध्दांत या पदांवर ११ महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीवर अगदी तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करण्यांसाठी विहीत अटींची व शर्तीची पूर्तता करणा-या पात्र व इच्छूक उमेदवारांकडून दि.१४-०३-२०२३ ते दि. २८-०३-२०२३ या कालावधीत कार्यालयीन वेळेत सायंकाळी ५-०० वाजेपर्यंत परिशिष्ट "अ" च्या नमुन्यात अर्ज पोस्टाने अथवा हस्तबटवडयाने पोहोचतील या बेताने मागविण्यांत येत आहेत. तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या अध्यापक यांचे पदांचा विषय व तपशील खालील प्रमाणे आहे.

| विषय | प्राध्यापक | सहयोगी प्राध्यापक | सहाय्यक प्राध्यापक |
|---|---|---|---|
| | एकूण रिक्त पदे (खुला प्रवर्ग) | | |
| संस्कृत संहिता सिध्दांत | --- | 01 | 01 (संस्कृत) |
| शारिररचना | 01* | -- | -- |
| **एकूण रिक्त पदे** | 01 | 01 | 01 |

(*संभावित रिक्त होणारे पद)

**टिप :- मुलाखतीच्या दिवसापर्यंत / रुजू दिनांकापर्यत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून / पदोन्नतीने किंवा बदलीने संबंधीत विषयातील प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक / सहाय्यक प्राध्यापक पदाचा उमेदवार उपलब्ध झाल्यास त्या संबंधीत विषयातील प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक / सहाय्यक प्राध्यापक पदासाठी करार पध्दतीवरील संबंधीत उमेदवाराचा नियुक्तीसाठी विचार केला जाणार नाही.**

| | | |
|---|---|---|
| **पदनाम** | :- | प्राध्यापक |
| **वयोमर्यादा** | :- | कमाल वयोमर्यादा ६५ वर्षापर्यंत (परंतु सदर अध्यापकांची त्याच्या वयाच्या ६५ वर्षे पुर्ण होईपर्यत त्यांचा किमान ११ महिने सेवा कालावधी पूर्ण होणे आवश्यक राहील.) |



Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| **शैक्षणिक अर्हता** | :- | १) महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२८) या अधिनियमाच्या परिशिष्टाच्या भाग-अ, भाग-अ-१, भाग-ब किंवा भाग-क मध्ये नमूद केलेल्या अर्हतांपैकी एक अथवा भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद अधिनियम, १९७० (१९७० चा ४८) या अधिनियमाखाली, भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद / भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग यांनी वेळोवेळी निर्देशित केलेली समतुल्य अर्हता.<br>२) सांविधिक विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेची संबंधित आयुर्वेदिक विषयातील पदव्युत्तर पदवी.<br>३) ज्या उमेदवारांचे आयुर्वेदाविषयीचे स्वतःचे मूलभूत संशोधन, निबंध किंवा पुस्तके प्रसिध्द झालेली आहेत अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यांत येईल.<br>४) मराठी, हिंदी, इंग्रजी व संस्कृत भाषेचे पुरेसे ज्ञान असावे, म्हणजेच त्यानुसार त्या भाषा सहजरीत्या लिहिण्यांस, वाचण्यांस, व बोलण्यांस उमेदवार समर्थ असला पाहिजे.<br>५) भा.चि.कें.प./भा.चि.प.राष्ट्रीय आयोगाने निश्चित केलेला शिक्षक (Teacher code) सांकेतांक असणे आवश्यक आहे. |
| **अनुभव** | :- | शैक्षणिक अर्हतेमधील (१ व २) येथे दर्शविलेली अर्हता प्राप्त करुन घेतल्यानंतर संबधित आयुर्वेदाच्या विषयामध्ये एकुण १० वर्षाचा अध्यापनाचा अनुभव आवश्यक असेल. त्यापैकी मान्यताप्राप्त संस्थेतून संबधित आयुर्वेदाच्या विषयाचे सहयोगी प्राध्यापक पदाचा किमान ०५ वर्षे अध्यापनाचा अनुभव असणे आवश्यक राहील. |
| **मानधन** | :- | प्रतिमाह रु.१,००,०००/- (या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञेय असणार नाहीत). तसेच सदर मानधन हे १०- कंत्राटी सेवा या लेखाशिर्षाखाली अनुदान उपलब्धतेच्या व उमेदवारांच्या उपस्थितीच्या अधिन राहून अदा करण्यांत येईल. |

| | | |
|---|---|---|
| **पदनाम** | :- | **सहयोगी प्राध्यापक** |
| **वयोमर्यादा** | :- | कमाल वयोमर्यादा ६५ वर्षापर्यंत (परंतु सदर अध्यापकांची त्याच्या वयाच्या ६५ वर्षे पुर्ण होईपर्यत त्यांचा किमान ११ महिने सेवा कालावधी पूर्ण होणे आवश्यक राहील.) |
| **शैक्षणिक अर्हता** | :- | १) या अधिनियमाच्या परिशिष्टाच्या भाग-अ, भाग-अ-१, भाग-ब किंवा भाग-क मध्ये नमूद केलेल्या अर्हतांपैकी एक अथवा भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद अधिनियम, १९७० (१९७० चा ४८) या अधिनियमाखाली, भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद / भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग यांनी वेळोवेळी निर्देशित केलेली समतुल्य अर्हता. |

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| | | २) महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २८) या अधिनियमाच्या परिशिष्टाच्या भाग-अ, भाग-अ-१, भाग-ब किंवा भाग-क मध्ये नमूद केलेल्या अर्हतांपैकी एक अथवा भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद अधिनियम, १९७० (१९७० चा ४८) या अधिनियमाखाली, भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद / भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग यांनी वेळोवेळी निर्देशित केलेली समतुल्य अर्हता.<br>३) सांविधिक विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेची संबंधित आयुर्वेदिक विषयातील पदव्युत्तर पदवी.<br>४) ज्या उमेदवारांचे आयुर्वेदाविषयीचे स्वत:चे मूलभूत संशोधन, निबंध किंवा पुस्तके प्रसिध्द झालेली आहेत अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यांत येईल.<br>५) मराठी, हिंदी, इंग्रजी व संस्कृत भाषेचे पुरेसे ज्ञान असावे, म्हणजेच त्यानुसार त्या भाषा सहजरीत्या लिहिण्यांस, वाचण्यांस, व बोलण्यांस उमेदवार समर्थ असला पाहिजे.<br>६) राष्ट्रीय आयोगाने निश्चित केलेला शिक्षक (Teacher code) सांकेतांक असणे आवश्यक आहे. |
| **अनुभव** | :- | शैक्षणिक अर्हतेमधील (१ व २) येथे दर्शविलेली अर्हता प्राप्त करुन घेतल्यानंतर संबधित आयुर्वेदाच्या विषयामध्ये एकुण ०५ वर्षाचा अध्यापनाचा अनुभव आवश्यक असेल. त्यापैकी मान्यताप्राप्त संस्थेतून संबंधित आयुर्वेदाच्या विषयाचे सहाय्यक प्राध्यापक पदाचा किमान ०३ वर्षे अध्यापनाचा अनुभव असणे आवश्यक राहील. |
| **मानधन** | :- | प्रतिमाह रु.८०,०००/- (या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञेय असणार नाहीत). तसेच सदर मानधन हे तसेच सदर मानधन हे १०- कंत्राटी सेवा या लेखाशिर्षाखाली अनुदान उपलब्धतेच्या व उमेदवारांच्या उपस्थितीच्या अधिन राहून अदा करण्यांत येईल. |

| | | |
|---|---|---|
| **पदनाम** | :- | **सहाय्यक प्राध्यापक (संस्कृत)** |
| **वयोमर्यादा** | :- | कमाल वयोमर्यादा ६५ वर्षापर्यत (परंतु सदर अध्यापकांची त्याच्या वयाच्या ६५ वर्षे पुर्ण होईपर्यत त्यांचा किमान ११ महिने सेवा कालावधी पूर्ण होणे आवश्यक राहील.) |
| **शैक्षणिक अर्हता** | :- | १) ज्याने एम.ए.(संस्कृत) किंवा व्याकरणाचार्य किंवा साहित्याचार्य यासारखी संस्कृत मधील पदव्युत्तर पदवी किंवा संविधिक विद्यापीठाने किंवा विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिलेली तिच्याशी समतुल्य अर्हता धारण केलेली असेल.<br>२) मराठी, हिंदी, इंग्रजी व संस्कृत भाषेचे पुरेसे ज्ञान असावे, म्हणजेच त्यानुसार त्या भाषा सहजरीत्या लिहिण्यांस, वाचण्यांस, व बोलण्यांस उमेदवार समर्थ असला पाहीजे.<br>३) अ.क्र.३ मधील अर्हतेसह बी.ए.एम.एस.पदवीधर उमेदवारास प्राधान्य देण्यांत येईल. |
| **मानधन** | :- | प्रतिमाह रु.७०,०००/- (या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञेय असणार नाहीत) तसेच सदर मानधन हे १०- कंत्राटी सेवा या लेखाशिर्षाखाली अनुदान उपलब्धतेच्या व उमेदवारांच्या उपस्थितीच्या अधिन राहून अदा करण्यांत येईल. |



Scanned with CamScanner

## इतर अटी व शर्ती

| | | |
|---|---|---|
| **इतर अटी** | १ | कंत्राटी पध्दतीने करावयाच्या नियुक्तीचा कालावधी हा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून किंवा आस्थापना मंडळाकडून वा बदलीने तसेच अन्य प्रशासनिक कारणास्तव पात्र उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा ११ महिने कालावधी यापैकी जे अगोदर घडेल तो कालावधी राहील. मात्र कोणत्याही परिस्थितीत ११ महिन्याच्या कालावधीनंतर खंड दिल्याशिवाय पुनः करार पध्दतीने नियुक्ती दिली जाणार नाही. तथापी अशा प्रकारच्या पुनर्नियुक्त्या उमेदवाराने त्याच्या वयाची ६५ वर्षे पूर्ण केल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत देय असणार नाहीत. |
| | २ | सदर पदावर नियमित उमेदवारांची नियुक्ती झाल्यास त्या तारखेस अन्यथा ११ महिन्यानंतर कंत्राटी स्वरुपाची नियुक्ती आपोआप संपुष्ठात येईल. |
| | ३ | नियुक्तीसाठी बाहयशक्तीचा दबाव अथवा शिफारस आणणारे उमेदवार नियुक्तीसाठी आपोआप अपात्र ठरतील. |
| | ४ | नियमित नियुक्त आणि कार्यरत असलेल्या अध्यापकांप्रमाणेच उमेदवारास पदाची कर्तव्य आणि जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतील व त्यांच्याप्रमाणेच कामाचे तास राहतील तसेच त्यांना प्राप्त होणार कागदपत्र/ माहिती, इतर सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे उमेदवारास आवश्यक राहील. |
| | ५ | कंत्राटी पध्दतीवर नियुक्ती केलेल्या उमेदवारास त्याच्या सेवा कालावधीत केवळ ७ नैमित्तीक रजा अनुज्ञेय राहतील. इतर कोणत्याही प्रकारच्या रजा अनुज्ञेय राहणार नाहीत. शासकीय सुट्टयांमध्ये गरजेप्रमाणे महाविद्यालयात किंवा रुग्णालयात सेवा देणे गरजेचे राहील. सीएमई प्रशिक्षणाचा कालावधी कर्तव्य कालावधी समजण्यांत येणार नाही. त्याकरीता नियमाप्रमाणे नैमित्तीक रजा भरुन द्यावी लागेल अथवा सदर सीएमई प्रशिक्षण कालावधीचे मानधन कपात करण्यांत येईल. |
| | ६ | कंत्राटी पध्दतीवरील नियुक्ती दिलेल्या उमेदवारास राजीनामा द्यावयाचा झाल्यास त्यांनी ०३ महिन्यांची आगाऊ नोटीस अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, बारामती, जि. पुणे यांचेकडे देणे बंधनकारक राहील. ते शक्य नसल्यास ०३ महिन्यांच्या मानधनाची रक्कम शासकीय कोषागारात जमा केल्यानंतरच नियुक्त उमेदवाराचा राजीनामा अधिष्ठातांना मंजूर करता येईल. आपण कोणत्याही कारणास्तव विनापरवानगी सतत सात दिवसांपेक्षा जास्त कालावधी करीता अनुपस्थित असल्यास विद्यार्थी/रुग्ण हितास्तव आपली नियुक्ती पूर्वसूचना न देता समाप्त करण्यांचे संपूर्ण अधिकार अधिष्ठाता यांचेकडे राहतील. या परिस्थितीतही आपणांस तीन महिन्यांच्या मानधनाची रक्कम शासकीय कोषागारात जमा करणे आवश्यक राहील. |
| | ७ | कंत्राटी पध्दतीवर नियुक्ती केलेल्या उमेदवारांच्या कामकाजाचा आढावा विभागप्रमुख व अधिष्ठाता यांच्याकडून नियमितपणे घेण्यांत येईल. असा आढावा असमाधानकारक असल्यास, गंभीर स्वरुपाची अनियमितता व गैरवर्तणूक आढळल्यास संबंधीत उमेदवारांच्या नियुक्त्या पूर्वसुचना न देता समाप्त करण्याचे अधिकार अधिष्ठातांकडे राहतील. |
| | ८ | कंत्राटी पध्दतीच्या नियुक्त उमेदवारास प्रस्थापित मानकानुसार अध्यापन, रुग्णसेवा, व इतर अनुषंगीक कामकाज विभागातील वरिष्ठ अध्यापक तसेच अधिष्ठाता यांच्या नियंत्रणाखाली नेमूण दिलेली विवक्षित कामे व आपल्या पदाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतील तसेच या उमेदवारांना नियमित अध्यापकांप्रमाणे पूर्णवेळ काम करणे बंधनकारक राहील. |

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| | ९ | कंत्राटी पध्दतीवरील नियुक्त अध्यापकांना त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या वरील प्रमाणे विहित कामकाज पार पाडल्यानंतर महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदाऱ्यांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची दक्षता घेऊन खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्याची मुभा राहिल. तसेच त्यांना कार्यालयीन वेळेत वैद्यकीय व्यवसाय करता येणार नाही. तसे आढळल्यास त्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यांत येईल. |
| | १० | नियुक्ती आदेश मिळाल्यापासून ०७ दिवसांच्या आत नियुक्तीच्या ठिकाणी रुजू न झाल्यास नियुक्तीवरील दावा आपोआप संपुष्टात येईल. |
| | ११ | कंत्राटी पध्दतीवरील नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही व याबाबत न्यायालयातही कंत्राटी पध्दतीची नियुक्ती कायम करण्यांबाबतचा दावा करता येणार नाही. तसेच कंत्राटी पध्दतीवरील काम केलेला कालावधी कोणत्याही सेवा प्रयोजनासाठी / सेवानिवृत्तीच्या लाभासाठी ग्राहय धरला जाणार नाही. |
| | १२ | शासन निर्णयातील अटी व शर्तीचे पालन करणेसंबधीचे तसेच कायम नियुक्तीसाठी न्यायालयात दावा दाखल न करणेसंबधीचे बंधपत्र या कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील. |
| | १३ | शासन/सक्षम प्राधिकरण/कार्यालयाकडून वेळोवेळी निश्चित होणारे पदासंबंधीच्या आवश्यकतेप्रमाणे बंधपत्र रुजू होते वेळी देणे बंधनकारक राहिल, तसेच शासन/सक्षम प्राधिकरण/कार्यालयाकडून वेळोवेळी प्राप्त निर्देश/आदेशाचे पालन करणे संबधितास बंधनकारक राहील. |
| | १४ | उमेदवार अन्य संस्थेत कार्यरत असल्यास संबधित संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र तसेच उमेदवारांची निवड झाल्यास रुजू होते वेळी संबधित संस्थेचे कार्यमुक्ती आदेश (Relieving Order) सोबत असणे आवश्यक राहील. |
| | १५ | उमेदवाराने वयाची ६५ वर्ष पुर्ण केल्यानंतर त्यांची सेवा आपोआप संपुष्टात येईल/ समाप्त करण्यात येईल. |
| | १६ | सदर पदाचे कंत्राटी मानधन "१०- कंत्राटी सेवा" या लेखाशिर्षाखाली अनुदान उपलब्धतेनुसार अदा करण्यांत येत असल्याने सदर लेखाशिर्षात अनुदान उपलब्ध होईपर्यत विलंब होऊ शकतो. त्यासाठी कार्यालयाकडे कोणताही तगादा लावता येणार नाही. |
| | १७ | कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यांत आलेल्या उमेदवारास कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करण्यांत येणार नाहीत. |
| | १८ | उमेदवारांनी मुलाखतीस येताना आवश्यक त्या सर्व संबंधीत मूळ कागदपत्रे व त्यांच्या सत्यप्रती, तसेच अनुभव प्रमाणपत्र, मूळ संस्थेचे ना हरकत प्रमाणत्र सोबत आणणे अनिवार्य राहील. |
| | १९ | प्रत्यक्ष मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी आयुष संचालनालयाच्या संकेत स्थळावर (www.mahayush.gov.in) प्रकाशित करण्यांत येईल. |
| | २० | सदर अध्यापकीय पदे ही कंत्राटी पध्दतीने भरावयाची असल्याने त्यासाठी कोणतेही आरक्षण लागू राहणार नाही. |
| | २१ | चिकित्सालयीन सहाय्यक प्राध्यापकांना संबंधीत विभागाचे रुग्णालयीन कामकाज पूर्ण वेळ करणे बंधनकारक राहील. तसेच आवश्यकतेनुसार त्यांना महाविद्यालयीन कामकाजही करावे लागतील. |
| | २२ | नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर फेरबदल करण्याचे किंवा रद्द करण्याचे सर्व अधिकार अधिष्ठाता यांचेकडे राखीव आहेत. |



Scanned with CamScanner

तरी इच्छुक उमेदवारांनी www.mahaayush.in या संचालनालयाच्या नविन संकेतस्थळावर तसेच www.gacbaramati.com या महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेल्या विहित नमुन्यातच अर्ज भरुन, आवश्यक मूळ प्रमाणपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रतींसह अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती, द्वारा शिवनगर विद्या प्रसारक मंडळ आवार, मु.पो.माळेगांव (बु.) ता.बारामती, जि. पुणे-४१३११५ या पत्त्यावर दि. २८-०३-२०२३ रोजी सायंकाळी ५-०० वाजेपर्यत प्रत्यक्ष / पोस्टाने / हस्तबटवडयाने पोहोचतील, या बेताने पाठवावेत. नमुद दिनांक व वेळेनंतर तसेच ई-मेल द्वारे पाठविण्यांत आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही, याची दक्षता संबंधीत उमेदवारांनी घ्यावी. सदर अर्ज पाठवितांना **लिफाफयावर “. . . . . . . . . . . . . . . . . . . . (संबंधीत विषयाचे नांव व पदनाम) पदावरील कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या नियुक्तीसाठी अर्ज” असे ठळक अक्षरांत लिहावे.** प्रत्यक्ष मुलाखतीच्या वेळी अर्जासोबत जोडलेल्या सर्व प्रमाणपत्राच्या मूळ प्रती सादर करणे आवश्यक राहील.

**प्रथमतः** उमेदवाराच्या प्रमाणपत्रांची तपासणी करण्यांत येईल. तपासणीअंती उमेदवार पात्र ठरल्यासच मुलाखत घेतली जाईल.

कंत्राटी **पध्दतीच्या भरतीसाठीचे संभावित वेळापत्रक खालील प्रमाणे असेल. त्यास प्रासंगिक बदल करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांचेकडे राखीव असतील.**

१) अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ - दि.२८-०३-२०२३ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत.

२) प्रत्यक्ष मुलाखतीस पात्र उमेदवारांची यादी www.gacbaramati.com या महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येईल

३) मुलाखतीचा कार्यक्रम स्वतंत्रपणे www.gacbaramati.com या महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येईल

**महत्वाची सुचना :-** उमेदवारानी मुलाखतीस येतांना सर्व संबधीत मूळ कागदपत्रे व त्याच्या ०२ साक्षांकीत सत्यप्रती सोबत आणाव्यात तसेच अनुभव प्रमाणपत्र, मूळ संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र सोबत आणणे अनिवार्य राहील. उमेद्वारांना सूचित करण्यात येते की, आवेदनपत्राचा नमुना, अर्हता, अटी ई.बाबतचा सविस्तर तपशील www.gacbaramati.com या वेबसाईटवरुन संबधीतांनी सविस्तर माहीतीच्या अर्जाचा नमुना प्राप्त करुन घ्यावा.

सही/-
अधिष्ठाता,
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय,
बारामती, पुणे.



Scanned with CamScanner

परिशिष्ट-अ सोबतच्या अर्जासोबत आपणांस लागु असलेल्या कागदपत्रांच्या स्वसाक्षांकीत झेरॉक्स प्रती खालील क्रमाप्रमाणे संलग्नीत करणे आवश्यक आहेत.

| अ.क्र. | अर्जासोबत जोडलेल्या झेरॉक्स कागदपत्रांचा तपशिल | शेरा |
|---|---|---|
| १ | बी.ए.एम.एस.प्रथम वर्ष ते अंतिम वर्ष सर्व गुणपत्रिका | |
| २ | बी.ए.एम.एस.पासिंग प्रमाणपत्र | |
| ३ | बी.ए.एम.एस.पदवी प्रमाणपत्र | |
| ४ | बी.ए.एम.एस.रजिस्ट्रेशन (स्टेट कौन्सील) | |
| ५ | आंतरवासियता कम्प्लीशन प्रमाणपत्र | |
| ६ | एम.डी./एम.एस.पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र | |
| ७ | एम.डी./एम.एस.पासिंग प्रमाणपत्र | |
| ८ | अनुभव प्रमाणपत्र | |
| ९ | संस्कृत विषयाचे पदवी किंवा तत्सम प्रमाणपत्र | |
| १० | सेवेत कार्यरत असल्यास नाहरकत प्रमाणपत्र | |
| ११ | राष्ट्रीयत्व व अधिवास प्रमाणपत्र | |
| १२ | दहावी सनद प्रमाणपत्र | |
| १३ | विद्यापीठ मान्यता प्रमाणपत्र (अॅप्रुव्हल) | |
| १४ | आधार कार्ड | |
| १५ | पॅन कार्ड | |
| १६ | राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावर इंडेक्स्ड जर्नल मध्ये प्रकाशित लेखांचा तपशिल व प्रसिध्दीबाबत पुरावा | |
| १७ | प्रकाशित पुस्तके यादी व पुरावा | |
| १८ | पुरस्कार इत्यादी यादी व पुरावा | |
| १९ | एम.एस.सी.आय.टी. | |
| २० | राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय चर्चासत्रे/सेमीनार/कॉन्फरन्स इत्यादी मधील सहभाग वा पेपर प्रेझेन्टेशन इत्यादी | |
| २१ | इतर | |

Scanned with CamScanner

# परिशिष्ट "अ"

| पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवून त्यावर स्वत: स्वाक्षरी करावी. |
|---|

अर्जाचा नमुना
महाराष्ट्र शासन
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय बारामती, जि. पुणे

प्रति,
मा.अधिष्ठाता,
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय,
बारामती, जि.पुणे.

विषय :- आपल्या महाविद्यालयातील ................................ या पदावर कंत्राटी पध्दतीने अकरा महिन्यांच्या कालावधीसाठी नियुक्ती मिळणेबाबतचा अर्ज सादर करणेबाबत.
संदर्भ :- आपली जाहिरात दिनांक ..............

महोदय,
उपरोक्त संदर्भित जाहिरातीस अनुसरुन मी आपल्या माहविद्यालयातील प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक / सहाय्यक प्राध्यापक ........................ (विषय) या पदावर कंत्राटी पध्दतीने अकरा महिन्याच्या कालावधीकरीता जाहिरातीमध्ये नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून नियुक्ती मिळणेबाबतचा अर्ज सादर करीत आहे.
माझी संपुर्ण माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | संपूर्ण नांव | : | आडनाव | स्वत:चे नांव | वडिलांचे/पतीचे नांव |
| | | | | | |
| २) | नवीन अध्यापक सांकेतांक (Permanent NEW NCISM TEACHER CODE) | : | | | |
| ३) | पत्रव्यवहाराचा पत्ता पिनकोडसह | : | | | |
| ४) | दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक | : | | | |
| ५) | ई - मेल | : | | | |
| ६) | जन्मदिनांक | : | | | |
| ७) | अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या दिनांकास असलेले वय | : | वर्ष | महिने | दिवस |
| ८) | राष्ट्रीयत्व | : | | | |

Scanned with CamScanner

९) **शैक्षणिक अर्हता** : माध्यामिक/ उच्च माध्यमिक परिक्षा/ पदवी/ पदव्युत्तर शैक्षणिक अर्हता उत्तीर्ण प्रमाणपत्राबाबत नमूद करावे तसेच शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला व सर्व वर्षाच्या साक्षांकीत मार्कशिट/प्रमाणपत्र सोबत जोडाव्यात.

| अ.क्र. | बोर्डाचे / विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण केलेल्या परीक्षा | उत्तीर्ण केल्याचे वर्ष | प्राप्त टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| ४. | | | | |

१०) अवगत असणाऱ्या भाषा : (योग्य ठिकाणी (✓) अशी खूण करावी.)

| मराठी | हिंदी | इंग्रजी | संस्कृत | अन्य |
|---|---|---|---|---|
| | | | | |

११) कामाचा अनुभव : (प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडल्या असतील तरच ग्राहय धरला जाईल.)

| अ.क्र. | संस्थेचे नाव | धारण केलेले पद | अनुभवाचा कालावधी (दि...ते दि...) | विद्यापीठ शिक्षक मान्यता होती काय, असल्यास विद्यापीठाचे पत्र जोडावे (पत्र क्र. व दिनांक) |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |

१२) प्रकाशित लेखांचा तपशील (लेखांच्या साक्षांकित प्रती जोडण्यांत याव्यात)

१३) प्रकाशित पुस्तकांचा तपशील :

१४) पुरस्कार मिळाले असतील तर त्यांचा तपशील (प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडण्यांत याव्यात)

१५) अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांचा तपशील :

| | |
|---|---|
| १. | |
| २. | |
| ३. | |
| ४. | |

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| | ५. | |
| | ६ | |
| | ७. | |
| | ८. | |
| | ९. | |
| | १०. | |
| | ११. | |
| | १२. | |
| | १३. | |
| | १४. | |
| | १५. | |
| | १६. | |
| | १७. | |
| | १८. | |
| | १९. | |
| | २०. | |
| | २१. | |
| | २२. | |
| | २३. | |
| | २४. | |
| | २५. | |
| | २६. | |

**टिप :- परिशिष्ट "ब" व "क" तील प्रतिज्ञापत्रे एकाच १०० रुपयाचे बंधपत्रावर देण्यांत यावी.**

उमेदवाराची स्वाक्षरी
(संपूर्ण नावासहित)

Scanned with CamScanner

# परिशिष्ट "ब"

## प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीमती/कुमारी.................................................. प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो/करते की, वर नमूद केलेली माहीती पूर्णतः खरी असून ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या ठिकाणी कोणत्याही टप्प्यावर किंवा नियुक्तीनंतर रद्द करण्यांत येईल आणि माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई होईल, याची मला जाणीव आहे. तसेच सदरची नेमणूक निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची कंत्राटी पध्दतीवर असल्यामुळे नियमित नियुक्तीसाठी मला हक्क सांगता येणार नाही आणि जाहिरातीत उल्लेखित कारणास्तव नियमित नियुक्तीचा उमेदवार उपलब्ध झाल्यास माझी तात्पुरत्या स्वरुपाची कंत्राटी नेमणूक आपोआप रद्द होईल, याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक :

उमेदवाराची स्वाक्षरी

(संपूर्ण नावासहित)

# परिशिष्ट "क"

## शपथपत्र

मी श्री/श्रीमती................................................................प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो/करते की, जाहिरातीत नमूद अटी व शर्तीचे पालन करुन, कायम नियुक्तीसाठी न्यायालयात दावा दाखल करणार नाही. तसेच शासन/ सक्षम प्राधिकरण/ कार्यालयाकडून वेळोवेळी प्राप्त निर्देश/ आदेशाचे पालन करीन.

ठिकाण :

दिनांक :

उमेदवाराची स्वाक्षरी

(संपूर्ण नावासहित)

Scanned with CamScanner

# परिशिष्ट "ड"

## ना हरकत प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यांत येते की, वैद्य/वैद्या............................... या महाविद्यालयात दिनांक ... ............ पासून ................या पदावर कार्यरत आहेत. वैद्य/वैद्या............................ यांची शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, व रुग्णालय बारामती जि. पुणे,येथे प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक/ सहाय्यक प्राध्यापक या पदावर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती झाल्यास महाविद्यालय त्यांना कार्यमुक्त करेल व त्यांच्या या मुलाखतीस महाविद्यालयाची व संस्थेची काहीही हरकत नाही.

संस्थाप्रमुख

.............................

.............................

ठिकाण :

दिनांक :

प्राचार्य/ अधिष्ठाता

.............................

.............................

ठिकाण :

दिनांक :

Scanned with CamScanner